ठाणे, शनिवार दि. ६ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ६९ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक
महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
ब्रिटनमधील सत्ताबदल
ब्रिटनमध्ये नुकतेच सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान पार पडले. लेबर पार्टीने १४ वर्षांनी ब्रिटनमध्ये सत्तांतर घडवून आणले आहे. किएर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीने ४१२ जागा जिंकुन इतिहास घडवला.
.....पान २ वर

कर्करोगास प्रतिबंध करण्यासही फणस गुणकारी
...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper
PDF
www.maharashtrasamrat.com

तापमान
कमाल ३६° से | किमान २९° से

बाजार
सोने ७३,०९० | चांदी ९३,२००

डोकं खाजवा –अशोक सुतार

दुधाचे दर वाढवणार म्हणतोस ? माझा चारा कधी वाढवणार आहेस?...

विधिमंडळात पहिल्यांदाच, विश्वविजेत्यांचा सन्मान..!
महाराष्ट्र शासनाच्या वतीने अकरा कोटी रुपयांचे विशेष पारितोषिक जाहीर (सविस्तर वृत्त पान २ वर)

कांदळवनावर मैदाने – बांधकामे
चौकशी समिती नेमून कारवाई...

ठाण्यातील कोलशेत, बाळकुम खाडीकिनारी कांदळवनावर भराव टाकून मैदाने झाली असून वसाहतीही बांधल्या आहेत. त्यामुळे फ्लेमिंगोसारख्या विदेशी पक्षांचा निवारा उठला असून निसर्गाची हानीही झाल्याचा आरोप आमदार संजय केळकर यांनी अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासात केला. यावेळी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चौकशी समिती नेमून शिक्षेतही कठोरता आणण्याचे आश्वासन दिले.

आमदार संजय केळकर यांच्या प्रश्नावर वनमंत्र्यांची घोषणा

ठाणे – आमदार संजय केळकर यांनी अधिवेशनात ठाणे शहरातील कांदळवन ऱ्हास, पर्यायाने होत असलेल्या निसर्गाच्या हानीचा मुद्दा उपस्थित केला. कोलशेत आणि बाळकुम भागात खाडीतील कांदळवन मातीभरावाने उद्ध्वस्त झाली असून येथे मैदाने तयार झाली आहेत. तर या आधी कांदळवन तोडून त्यावर बांधकामेही झाली आहेत. नागरीकरणामुळे येथे पूर्वी येणारे फ्लेमिंगोसारखे विदेशी पक्षी देखील येईनासे झाले आहेत तर निसर्गाचाही ऱ्हास झाला असल्याचे श्री.केळकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले. याबाबत वन, महसूल आणि महापालिका एकमेकांकडे बोट दाखवून कारवाई टाळत आहेत. त्यामुळे भूमाफिया आणि तथाकथित विकासकांचे फावले असून काँक्रीटची जंगले वाढत आहेत, त्यामुळे या तीन पैकी (पान २ वर)

थोडक्यात घडामोडी

दिव्यात ५० हजारांची खंडणी प्रकरणी दोघांना अटक
ठाणे – दिवा शहरात बांधकामाविरोधात ठाणे महानगरपालीकेत तक्रार करण्याची धमकी देवून ५० हजारांची खंडणीची मागणी करणाऱ्या दुकलीला खंडणीची रक्कम स्वीकारतांना रंगेहाथ पकडून केली अटक करण्यात आली. तक्रारदार गणपत म्हात्रे रा. दातीवली ठाणे यांनी इसम नामे गोवर्धन पाटील, रा डोंबीवली व त्याचे सहकारी सन्नी, जितू वाघमारे हे मिळुन ते मुंब्रादेवी परिसरात करीत असलेल्या इमारतीचे बांधकामाविरोधात ठाणे महानगरपालीकेत तक्रार करण्याची धमकी देवून तकार न करण्यासाठी ५० हजारांची मागणी केली तसेच पैसे न दिल्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्याचे धमकीला घाबरून तकारदार गणपत म्हात्रे यांनी गोवर्धन पाटील व त्याचे सहकारी यांना २०,०००/- रूपये दिले होते. परंतू गोवर्धन पाटील हा वारंवार उर्वरीत ३०,०००/- रूपयाची मागणी करीत असल्याने तकारदार यांनी मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे यांचे कार्यालयात तक्रार अर्ज दि. २८/०६/२०२४ रोजी केला होता. खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मालोजी शिंदे यांनी खंडणीची मागणी करणाऱ्या इसमांना खंडणीची रक्कम स्वीकारतांना रंगेहाथ पकडण्यासाठी दि. ३ जुलै रोजी सापळा लावून दुपारी १३:५० वा दिवा प्रभाग समिती कार्यालयाजवळ, (पान २ वर)

कळवा रुग्णालयात जून महिन्यात 21 नवजात बालकांचा मृत्यू, सहा महिन्यात 89 बालकें दगावली

रुग्णालयात अनेक कमतरता

ठाणे : ठाणे महानगरपालिकेचे (TMC) छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय या रुग्णालयात अनेक रुग्ण उपचाराकरता येत असतात.जून महिन्यात तब्बल २१ नवजात बालकांनी (NICU) त्यांचा जीव गमावल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये एकाच दिवशी १८ रुग्ण दगावल्याच्या घटनेला एक वर्ष पूर्ण होत नाही तोच पुन्हा एकदा ठाणे महापालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचा भोंगळ कारभार समोर आला आहे.

- कर्मचाऱ्यांची कमतरता
- रुग्णालयात असुविधा
- डॉक्टरांचे दुर्लक्ष

या बाबींमुळे हे रुग्णालय चर्चेचा विषय ठरल आहे.

२०२४ मध्ये जानेवारी महिन्यात १७ फेब्रुवारी मध्ये १० मार्चमध्ये २२ एप्रिल मध्ये २४ तर मे महिन्यात १६ आणि मागील जून महिन्यात २१ अशा नवाजात बालकांनी त्यांचा जीव गमावला आहे.एकूण ८९ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर येत आहे.मागील महिन्यात पाहिले तर रुग्णालयाने दिलेल्या माहितीनुसार जून महिन्यात ५१२ महिलांची प्रसुती करण्यात आली आहे. आलेले ९० नवजात बालके हे गंभीररित्या आले होते त्यातील २१ जणांचा मृत्यू तर या मध्ये ही बाहेरून आलेली होती तर काही अगदी गंभीर १९ नवजात बालकांचे वजन हव्या त्या वजनापेक्षा कमी होते. १५ बालक नऊ महिन्याच्या आधी जन्मलेले होते ६ नवजात बालके हे रुग्णालयाच्या बाहेर जन्मलेले होते परिस्थितीमध्ये होती. तर यातील तीन नवजात बालक रुग्णालयात भरती होण्याआधी मृत्यू झाले होते.१३ नवजात बालकांच वजन दीड किलो पेक्षा कमी होते .यातील तीन नवजात बालकाचे वजन एक किलो पेक्षा कमी होते .काहींनी त्यांचा जीव ४८ तासाच्या आतच गमावल्याचे रुग्णालय प्रशासनाने म्हटले आहे.

रुग्णालयात अनेक कमतरता
ठाणे जिल्हा रुग्णालयाचे नुतनीकरणाचे काम सुरू असून हे रुग्णालय मनोरुग्णालयाच्या बाजूला हलवण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांना हे रुग्णालय प्रवासाच्या दृष्टीने लांब पडते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हे सद्यस्थितीत महत्त्वाचे रुग्णालय मानले जात आहे. मात्र कर्मचाऱ्यांची कमतरता, असुविधा आणि डॉक्टरांचे दुर्लक्ष या सगळ्या बाबींमुळे हे रुग्णालय चर्चेचा विषय ठरल आहे.

रुग्णालयात सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना
ऑगस्ट २०२३ रोजी एकाच दिवसात १८ रुग्ण दगावल्याची घटना येथे घडली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रुग्णालयाला भेट देत रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांना रुग्णालयात सुविधा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र अद्यापही रुग्णालयात सुविधा नसल्याची ओरड रुग्णांच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे. तर रुग्णालयावर मोठा भार पडत असून भिवंडी, मुरबाड, शहापूर कल्याण आदी भागात एन आय सीयु ची सोय नसल्याने नवजात बालक अत्यावस्थ अवस्थेत येथे येतात. मात्र तत्काळ उपचार मिळाले नसल्याने त्यांच्यावर उपचार करणे कठीण असते. त्यामुळेच रुग्ण दगावण्याच्या घटना घडतात अशी सर्वात सर्व येथील अधिकारी डॉक्टर राकेश बारोट यांच्याकडून करण्यात येत आहे.छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय केवळ ३० एन आय सी यू खाट असून त्यातील २० खाटा रुग्णालयातील रुग्णांसाठी तर १० बाहेरून आलेल्या रुग्णांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

'घड्याळ घालणार तर पगार मिळणार', प्रशासनाचा इशारा

ठाणे – ठाणे महापालिकेच्या सेवेत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांवर वॉच ठेवण्यासाठी या सर्व सफाई कर्मचाऱ्यांना हातात डिजिटल ट्रॅकर घड्याळ हातात घालणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र ५० टक्के कर्मचारीच आपल्या हातात हे डिजिटल घड्याळ घालत असल्याने उर्वरित ५० टक्के कर्मचारी कामावर हजर आहेत कि नाही, या कर्मचाऱ्यांवर वॉच कसा ठेवायचा असा प्रश्न पालिका प्रशासना समोर निर्माण झाला आहे.

कर्मचाऱ्यांवर वॉच ठेवण्यासाठी तसेच कामाच्या ठिकाणी त्यांच्या आरोग्याच्या बाबतीत काही दुर्घटना घडल्यास त्वरित माहिती मिळावी यासाठी कर्मचाऱ्यांच्या हाती डीजीटल घड्याळ बांधण्याचा निर्णय घेण्यात आला होता. स्वच्छता मोहीमे अंतर्गत विविध उपक्रम ठाणे पालिकेच्या माध्यामतून राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ठाणे पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना हातात डिजिटल घड्याळ देण्यात आले आहे. पालिकेच्या आस्थापनेवर सुमारे १६०० सफाई कर्मचारी आहे. तर यामध्ये खासगी तत्वावरील सफाई कामगार वेगळे आहेत.

परंतु काही वेळेला हजेरी शेडवर हजेरी लावून कर्मचारी गायब होत असल्याच्या तक्रारी पालिकेकडे वाढल्या होत्या.

अथवा आपल्या जागी दुसरा कर्मचारी दाखवून दुसरीकडे कामाला जात असल्याचेही दिसून येत होते. त्यामुळे अशा कामचुकार कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पालिकेने डिजिटल ट्रॅकर घड्याळ दिले आहेत. (पान २ वर)

कर्मचारी प्रत्यक्ष कामावर आहेत कि नाही याची माहिती मिळावी यासाठीच हे ट्रॅकर घड्याळ कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. मात्र काही कर्मचारी हे घड्याळ घालत नाहीत. तर काही कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक अडचणी आहेत. मात्र आता जे घड्याळ घालणार नाहीत त्यांचे वेतन मिळणार नाही असा निर्णय पालिका प्रशासनाकडून घेण्यात येऊ शकतो असा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

प्रशासनाचा कर्मचाऱ्यांवर वॉच

- वाहतूक कोंडीचा शुक्रवार

मल्टी एक्सल ट्रक बंद-घोडबंदरच्या वाहतुकीचे तीनतेरा

- चाकरमानी, ठाणेकर झाले बेहाल ...
- ट्रक चालकावर गुन्हा दाखल...

ठाणे – ठाण्याच्या घोडबंदर रोडवर घोडबंदरकडे जाणाऱ्या वाहिनीवर शुक्रवारी सकाळीच ७-३० वाजण्याच्या सुमारास आनंदनगर सिग्नल येथे बंद पडलेल्या मल्टी एक्सल ट्रकमुळे अवघ्या ठाण्याच्या वाहतुकीचा चक्काजाम करून टाकला. या चक्काजाम मधून सुटका करण्यासाठी वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागली. तर चाकरमानी आणि ठाणेअकर मात्र बेहाल झाल्याची परिस्थती शुक्रवारी सकाळी घडली. वाहतूक पोलिसांनी त्वरित बंद (पान २ वर)

नवी मुंबईत गणेश नाईक आणि शिंदे गट यांच्यात मोठा वाद

लोकसभेला संजीव नाईक यांना तिकीट हवे होते ते मिळाले नाही. जागा शिंदे गटाला गेली. ऐकेकाळी नवी मुंबईचे अनभिषीक्त सम्राट असेलले नाईक गेल्या काही वर्षात साईडलाईनला गेल्याचे चित्र पहायला मिळत आहे. सिडको आणि महापालिकेत असलेल्या वर्चस्वाला गेल्या काही वर्षात छेद गेल्याचं चित्र आहे. एकनाथ शिंदेंकडून नाईक विरोधकांना बळ दिले जात असल्याची चर्चा आहे. आता ऐरोलीवर शिंदे गटाने दावा केला आहे.

थेट सभागृहात सगळचं बोलून दाखवलं

नवी मुंबईत गणेश नाईक यांच्या मतदारसंघावरच शिवसेना शिंदे गटानं दावा केलाय. लोकसभेला शिंदे गटाच्या उमेदवाराला मोठी आघाडी ऐरोलीतून दिली तसेच या मतदारसंघात शिंदे गटाचे नगरसेवक जास्त निवडून आले होते असं सांगत शिंदे गटानं नाईकांच्या जागेवर दावा सांगितलाय. त्यामुळे भाजप आणि शिंदे गट यांच्यात नवी मुंबईत वाद उफाळून येण्याची शक्यता आहे.

एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्या पारंपारिक वादाची किनार या वादाला असल्याचीही चर्चा आहे. दोनच दिवसांपूर्वी भूखंडाच्या प्रश्नावरुन गणेश नाईक यांनी सभागृहात जोरदार बॅटिंग केली होती. अप्रत्यक्षपणे त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांवरच निशाणा साधल्याची चर्चा आहे. नवी मुंबईतील कुरघोड्यावरुन नाईक अस्वस्थ असल्याचंही बोललं जातंय.

अस्वस्थ गणेश नाईक यांचे थेट मुख्यमंत्र्यांनाच आव्हान

राज्यात सत्ता आल्यानंतरही मंत्रीपदापासून दूर ठेवले गेल्याने नाईक दुखावले गेले आहेत. लोकसभा निवडणुकीत हातातोंडाशी आलेला मुलाच्या उमेदवारीचा घास मुख्यमंत्र्यांनी ऐन वेळी हिरावून घेतला. राज्यात सत्ता असूनही नवी मुंबईतील घरच्या मैदानातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर झुंजावे लागत असल्याची भावना तीव्र होऊ लागल्याने भाजपचे ठाणे जिल्ह्यातील प्रभावी नेते गणेश नाईक यांनी सिडको आणि नगरविकास विभागाच्या माध्यमातून थेट मुख्यमंत्र्यांवरच निशाणा साधल्याचे बुधवारी विधिमंडळात पाहायला मिळाले.

राज्यात सत्ता आल्यानंतरही मंत्रीपदापासून दूर ठेवले गेल्याने नाईक दुखावले गेले आहेत. लोकसभा निवडणुकीत हातातोंडाशी आलेला मुलाच्या उमेदवारीचा घास मुख्यमंत्र्यांनी ऐन वेळी हिरावून घेतला. सिडको, नवी मुंबई महापालिका, एमआयडीसी यांसारख्या नाईकांच्या एके काळच्या सत्तासंस्थांवर सध्या मुख्यमंत्र्यांची सद्दी चालते.

महापालिकेतील कंत्राटी कामे, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, महत्त्वाचे निर्णय ठाण्यातून घेतले जात असल्याची नाईक समर्थकांची तक्रार आहे. या अस्वस्थतेला विधिमंडळात वाट मोकळी करून देत नाईकांनी मुख्यमंत्र्यांच्या विभागावर टीकेची झोड उठविल्याने ठाणे जिल्ह्यातील राजकारणात नाईक विरुद्ध शिंदे हे चित्र पुन्हा ठसठशीतपणे पुढे आले आहे.

- विधानसभेत अस्तित्वाची लढाई
- नाईक आक्रमक का होत आहेत ?

(सविस्तर वृत्त पान २ वर)

संपादकीय...

संपादक–चंद्रकांत भोईटे

ब्रिटनमधील सत्ताबदल

ब्रिटनमध्ये नुकतेच सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान पार पडले. लेबर पार्टीने १४ वर्षांनी ब्रिटनमध्ये सत्तांतर घडवून आणले आहे. किएर स्टार्मर यांच्या नेतृत्त्वाखाली लेबर पार्टीने ४१२ जागा जिंकुन इतिहास घडवला. तर,ऋषी सुनक यांच्या हुजूर पक्षाला १२२ जागा मिळाल्या आहेत. तर लिबरल डेमोक्रॅटस पक्षाला १९२३ नंतर सर्वाधिक ७१ जागा मिळाल्या. ब्रिटन संसदेची सदस्यसंख्या ६५० आहे. स्कॉटिश नॅशनल पार्टीला १० आणि इतर छोट्या मोठ्या पक्षांना मिळून ३१ जागा मिळाल्या आहेत. लेबर पार्टीने १९९७ नंतर पुन्हा एकदा चारशे जागांचा टप्पा पार केला आहे. लेबर पार्टीला १९९७ मध्ये सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. त्यावेळी पक्षाचे नेते टोनी ब्लेअर होते. पक्षाने त्यावेळी ४१९ जागा मिळवल्या होत्या. अर्थात ब्रिटनमध्ये सत्तापालट झाला आहे. ब्रिटनमधील माजी पंतप्रधान ऋषी सुनक यांनी बरितां येथील निवडणुकीत झालेल्या पराभवाची जबाबदारी स्वीकारली आहे. कन्झर्वेटीव्ह पक्षाची या निवडणुकीत मोठी घसरण झाली. किएर स्टार्मर यांचे विविध देशांच्या प्रमुखांनी निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन केले आहे. लेबर पार्टीला तब्बल २७ वर्षांनी निवडणुकीत यश मिळाले आहे. त्यांनी पुन्हा एकदा चारशे जागांचा टप्पा पार केला आहे. ऋषी सुनक हए निवडणुकीत विजई झाले आहेत. तर माजी पंतप्रधान लिझ ट्रस यांचा वेस्ट नॉरफॉक मधून पराभव झाला आहे. लिझ ट्रस हे सप्टेंबर २०२२ मध्ये पंतप्रधान पदी रुजू झाले होते. परंतु सहा महिन्याच्या आत त्यांना राजीनामा द्यावा लागला होता. ऋषी सुनक यांनी उत्तर इंग्लंडमधील रिचमंड आणि नॉर्थालर्टनेमधून ४७.५ टक्के मत मिळवत विजय मिळवला. सार्वत्रिक निवडणुकीतील विजयानंतर किएर स्टार्मर यांनी प्रसारमाध्यमांसोबत बोलताना, यावेळी त्यांनी आपण करुन दाखवल्याचे म्हटले. आपण यासाठी लढाई लढली होती. यासाठी मतदान केलं होतं, आता निकाल देखील आपल्या समोर असल्याचे किएर स्टार्मर यआणि म्हटले. स्टार्मर म्हणाले ही बदलेली लेबर पार्टी असून देशसेवेसाठी तत्पर आहे. ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक यांनी किएर स्टार्मर यांना निवडणुकीतील अभूतपूर्व विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या. ब्रिटनच्या संसदेत ६५० सदस्य असून बहुमतासाठी ३२६ सदस्य निवडून येण्याची आवश्यकता असते. लेबर पार्टी आघाडीवर असल्याचे जाहीर झाल्यानंतर ऋषी सुनक यांनी राजीनामा दिला. ब्रिटनमध्ये एक्झिट पोलचे अंदाज खरे ठतरल्याचे दिसून आले. ब्रिटनमध्ये ६५० पैकी लेबर पार्टीला ४३१ जागा मिळतील असा अंदाज युगव्ह या सर्व्हे करणाऱ्या संस्थेने वर्तवला होता. तर, हुजूर पक्षाला १०२ जागा मिळतील, असा अंदाज वर्तवला गेला होता. किएर स्टार्मर यांच्या विजयासह तब्बल १४ वर्षानंतर हुजूर पक्षाला सत्ता गमवावी लागली आहे. १४ वर्षांदरम्यान पाच पंतप्रधानांनी काम केले. डेविड कॅमेरुन, टेरेसा मे, बोरिस जॉनसन, लिझ ट्रस आणि ऋषी सुनक या पंतप्रधानांनी कारभार सांभाळला.

हुजूर पक्षाला त्यांच्या अंतर्गत वादाचा फटका बसल्याचे म्हटले जात आहे. प्रस्थापितविरोधी लाटेचा हुजूर पक्षाला फटका बसला. १४ वर्षांच्या राजवटीत ब्रिटनची आर्थिक आघाडीवर पीछेहाट, गृहनिर्माणाचे प्रश्न, बेरोजगारी, महागाई, स्थलांतरितांचे प्रश्न अशा अनेक आघाड्यांवर हुजूर पक्षाच्या नेत्यांची कामगिरी सुमार झाली होती. माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्या कार्यकाळात ब्रिटन युरोपियन युनियनमधून बाहेर पडल्यानंतर ब्रिटनमध्ये आर्थिक, राजकीय अस्थैर्य माजले. ब्रिटनमध्ये हुजूर पक्षाची (कन्झर्व्हेटिव्ह पार्टी) १४ वर्षांची सत्ता लेबर पार्टीच्या दणदणीत विजयाने संपुष्टात आणली आहे. युरोपियन युनियनमधून बाहेर पडलेल्या ब्रिटनमध्ये देशातील सत्ताधाऱ्यांना अनेक क्लिष्ट प्रश्न सोडविण्यात आलेले अपयश, सातत्याने होणारा नेतृत्वबदल, पक्षांतर्गत मतभेद, पक्षफुटी अशा अनेक आघाड्यांवर अपयश आलेल्या हुजूर पार्टीला ब्रिटनच्या जनतेने सत्तेतून पायउतार केले आहे. त्याच वेळी त्रिशंकू सभागृह न ठेवता बदल घडविण्याचे आश्वासन देणाऱ्या मजूर पक्षाला (लेबर पार्टी) स्पष्ट बहुमत देत संधी दिली. ब्रिटनच्या जनतेने, जे देशात जनतेची सेवा योग्यरीत्या करू शकतील, त्यांना संधी दिली असे म्हणता येईल.

सर्वसमावेशक अर्थसंकल्पावर आमदार प्रशांत ठाकूर यांचे विधिमंडळात भाषण; सभागृहात पोटतिडकीने मांडल्या पनवेलच्या समस्या

पनवेल (प्रतिनिधी)– राज्यातील सर्व घटकांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून सर्वसमावेशक असा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर झाला असून या अनुषंगाने विकासाचे चक्र निर्माण झाल्याचे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पावर विधिमंडळात बोलताना व्यक्त करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि संपूर्ण मंत्री मंडळाचे आभार व्यक्त केले. त्याचबरोबरीने पनवेल परिसरातील समस्याही त्यांनी सभागृहात पोटतिडकीने मांडल्या. आणि त्या लवकरात लवकर सुटण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची मागणी केली तसेच ज्या प्रमाणे राज्यात विकास होत आहे त्यानुसार हे प्रश्न लवकरच मार्गी लागतील असा विश्वासही व्यक्त केला.

या सर्व परिसराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून राज्य सरकार सकरात्मक पाऊले टाकत आहे पण घेतलेल्या निर्णयांची वेळेत अंमलबजावणी व्हावी. अनेक महत्वकांक्षी प्रकल्प या परिसरात सुरु झाल्यामुळे प्रचंड असे विकासाचे चक्र नवी मुंबई पनवेल परिसरात सुरु आहे, ते अखंडित चालू राहण्यासाठी अशा प्रकारच्या अर्थसंकल्पाची गरज होती. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि संपूर्ण सरकारचे आभार व्यक्त करतो.

–आ. प्रशांत ठाकूर

नुकताच सादर झालेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर भाषणात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात म्हंटले कि, हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांना, महिलांना आणि युवकांना समर्पित आहे. ३० जून २०२२ रोजी राज्याच्या मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतली आणि तेव्हापासून या महाराष्ट्राने नव्याने कात टाकलेली आपण पाहत आहोत. २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने वेगवेगळ्या पद्धतीचे जनताभिमुख निर्णय घेतले. त्या निर्णयांना २०१९ नंतर ब्रेक बसला होता तो ब्रेक आता निघालेला आहे. धडाडी आणि संयमी नेतृत्वातून घौडदौड सुरु झाली आहे. गेल्या दोन वर्षात लोकोपयोगी निर्णय घेण्यात आले आणि आत्ताच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून आजवर सुरु झालेल्या लोकोपयोगी निर्णयांचा एका अर्थाने कळस चढत आहे, त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. वारकऱ्यांसाठी घेतलेले निर्णय आणि सोयीसुविधांबद्दल आभार व्यक्त करत असताना विशेषत्वाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी घेतलेले निर्णय देशासाठी दिशादर्शक ठरले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, अन्नपूर्णा योजना, लखपती दीदी अशा दिशादर्शक योजना त्याचबरोबरीने स्टार्टअप आणि उच्च शिक्षणासाठी फी माफ करणे अशा योजनेतून महिलांचे सबलीकरण करण्याचे काम हाती घेत हे सरकार जागरूक असल्याचे दाखवून दिले आहे. तसेच राज्याच्या मुख्य सचिवपदी सुजाता सैनिक यांची नियुक्ती करून राज्य महिलांच्या हातात देण्याचे काम होत आहे हा संदेशही दिला आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

भाषणाच्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल परिसरातील समस्यांनाही हात घातला. नैना, वीज, पाणी विषय त्यांनी पोटतिडकीने मांडला. ज्या प्रमाणे राज्यात विकास होत आहे त्यानुसार हे प्रश्न लवकरच मार्गी लागतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले कि, विविध प्रकारचे अनेक प्रकल्प गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत साकार होत आहेत. आणि त्या माध्यमातून राज्याच्या प्रत्येक भागात आश्वासक असा विकास होत असताना दिसत आहे. सर्व समाज घटकांना सामावून घेणारा हा विकास आहे. अटल सेतूमुळे पनवेल, उरण किंबहुना रायगड जिल्ह्याचे चित्र विकासात बदलले आहे. विमानतळ पुढील वर्षी मार्चपर्यंत पूर्ण होणार आहे. त्यामुळे एकीकडे अटल सेतूने जोडणारा भाग आहे, विमानतळ होत आहे. त्यामुळे या भागात प्रचंड प्रमाणात विकास होताना पहायला मिळणार आहे. असे सांगतानाच आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मागण्या अधोरेखित केल्या. त्यांनी सांगितले कि, नैना प्राधिकरणाची स्थापना केली गेली त्या माध्यमातून नियोजनबद्ध विकास व्हावा. मात्र या परिसरातील काही शेतकऱ्यांच्या समस्या आहेत अडचणी आहेत, त्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. योग्य पद्धतीने संसाधनाचे नियोजन करणे आणि घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणीसाठी कणखर भूमिका आवश्यक आहे. पनवेल एसटी बसस्थानक बीओटी तत्वावर बनतोय पण वेगवेगळ्या प्रकारच्या तांत्रिक अडचणी मधल्या काळात आल्या. बीओटीचा कंत्राटदार अजूनही काम सुरु करत नाही जर योग्य वेळेत हा कंत्राटदार काम करत नसेल तर त्याला दिलेले काम रद्द करण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी शासन योग्य ती कार्यवाही करेल अशी खात्री आहे. नैनाच्या परिसरात विकास होत असताना त्याचबरोबरीने मेट्रोच्या कामाला सुरुवात झाली पाहिजे. नवी मुंबईची मेट्रो उशिराने सुरु झाली, त्यामुळे या परिसरातील मेट्रोच्या कामाला वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे. आरडीसीसीच्या माध्यमातून देवेंद्रजींनी ४८२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला मात्र त्या कामांना अद्याप सुरुवात झाली नाही. त्यामुळे परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. पनवेलसारख्या शहरामध्ये व्यापारी समाज हैराण झाला आहे. वाहिन्या भूमिगत करण्याची गरज आहे आणि यासाठीही शासनाने तातडीने निधी देण्याची आवश्यकता आहे. पाणी पुरवठा योजनेच्या दृष्टिकोनातून एमजीपी टप्पा ३चे काम सुरु झाले आहे. सप्टेंबरपर्यंत ते काम पूर्ण होणे आवश्यक आहे पण त्या कामात दिरंगाई होताना दिसत आहे. पावसाळा सुरु झाला असला तरी पाण्याचा तुडवडा भासत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे मोरबे धारण आहे, या धरणातील पाणी पुरवठा फक्त नवी मुंबईसाठी आहे अशी भूमिका नवी मुंबई महापालिकेची आहे. पण या महापालिकेची एकट्याची मालकी या धरणावर असून चालणार नाही. परिसरातील सर्व नवी मुंबईला पाणी पुरवठा योग्य प्रकारे झाला पाहिजे. पाणी देण्यात पनवेल महापालिका वासियांना सावत्रपणाची वागणूक नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून दिली जाते त्यावर शासनाने अंकुश आणण्याची गरज आहे. त्याचबरोबरीने वाढती लोकवस्ती पाहता नवीन धरणे बांधण्याची गरज असल्याचेही शासनाच्या लक्षात आणून देत तशी मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात केली.

विधिमंडळात पहिल्यांदाच, विश्वविजेत्यांचा सन्मान..!

मुंबई : विश्वविजेत्या टीम इंडियाचा विधानभवनात सत्कार पार पडला. विधानभवनात विश्वविजेत्या संघातील मुंबईकर खेळाडूंचा गौरव सोहळा पार पडला. टी२० विश्वविजेत्या संघातील मुंबईकर खेळाडू कर्णधार रोहित शर्मा याच्यासह सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि यशस्वी जैस्वाल या चार खेळाडूंचा विधानभवनात सत्कार करण्यात आला आहे. महाराष्ट्र विधानभवनात पहिल्यांदाच अशा प्रकारचा सत्कार सोहळा पार पडला.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, भारत हा क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे. हे आपल्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाने सिद्ध केले आहे. पराभवाच्या छायेतून विजयश्री खेचून आणून, कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्या संघाने भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी अशी कामगिरी केली असल्याचे सांगत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. भारतीय संघासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने अकरा कोटी रुपयांचे विशेष पारितोषिक जाहीर केले. तसेच मुंबई महानगर प्रदेशात भविष्यात भव्य आणि आधुनिक असे स्टेडियम उभारण्यास गती देण्यात येईल असेही स्पष्ट केले..

■ **रोहित शर्माचं मराठीत भाषण –** रोहित शर्मा याने यावेळी मुंबईकर शैलीत सर्वांना अभिवादन करत म्हटलं की, 'सर्वांना माझा नमस्कार. येथे बोलावल्यानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं खूप खूप आभार. आमच्यासाठी विधानभवनात असा कार्यक्रम केला, त्याबद्दल आभार. काल मुंबईमध्ये जे काही पाहिले, ते स्वप्नवत होतं. विश्वचषक जिंकणं आमचं स्वप्न होतं. २०२३ मध्ये संधी हुकली. सूर्या, दुबे किंवा माझ्यामुळे हे झालं नाही, असं नाही तर हे सर्वांमुळे सिद्ध झालं आहे. सर्व सहकारी माझ्यासोबत होते, त्यामुळे हे होऊ शकले. प्रत्येक सामन्याचा नायक वेगळा होता. त्याच्या हातात कॅच बसला नसता.. बरं झालं हातात कॅच बसला नाहीतर त्याला मी पुढे बसवले असते. सर्वांचे खूप खूप आभार.'

केवळ पनवेलमध्येच नाही तर संपूर्ण नवी मुंबईतील सर्वात मोठी सौर ऊर्जा प्रणाली कार्यान्वित...

पनवेल (प्रतिनिधी) - शाश्वत उर्जा पद्धतींसाठी एक ऐतिहासिक कामगिरी म्हणून पनवेल मधील कल्पतरू रिव्हरसाइड हाउसिंग सोसायटीने सौर ऊर्जा प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आज (शुक्रवार, दि. ०५) झाले. यावेळी त्यांनी हा उपक्रम पनवेलच्या ग्रीनर फ्युचरसाठी योगदान देणार असल्याचे प्रतिपादन केले. कल्पतरू सोसायटीमध्ये बसवण्यात आलेली सौर उर्जा प्रणाली ही ३०० किलोवॅट क्षमतेची असून केवळ पनवेलमध्येच नाही तर संपूर्ण नवी मुंबईतील सर्वात मोठी आहे. हा प्रकल्प डेट इंजिनीअरिंगने तीन महिन्यांच्या विक्रमी वेळेत अंदाजे एक कोटी वीस लाख रुपये खर्च करून पूर्ण केला आहे. हा प्रकल्प दरमहा अंदाजे ३६००० युनिट वीज निर्मितीसाठी सज्ज आहे. यामुळे वीज बिलांवर सुमारे ७० लाख रुपयांची वार्षिक बचत होणार आहे. या वेळी माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, प्रशांत बाळाराम ठाकूर, गुडापती ब्रह्माजी, मिलिंद कुलकर्णी, संस्थेचे सचिव सतीश पिल्लई, विनीत मित्तल, सोसायटीचे खजिनदार समर चौहान, उद्योगपती मनोज आंग्रे, वैभव देशमुख, भार्गव ठाकूर, विजय रेखी, दिलीप घरत, रवि म्हात्रे, संदीप साळुंके, पूजा सिंग, साक्षी पत्की, जिंदा दिलचे अध्यक्ष नितीन मोरे यांच्यासह इतर व्यवस्थापकीय समिती सदस्य आणि कल्पतरू सोसायटीचे रहिवासी उपस्थित होते.

माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

मुख्यमंत्र्यांकडून वर्षा निवासस्थानी सत्कार

याआधी जगज्जेत्या भारतीय क्रिकेट संघाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षा निवासस्थानी स्वागत केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी खेळाडू आणि सपोर्ट स्टाफचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला.

चौकशी समिती नेमून कारवाई...

(पान १ वरून) एकाच विभागाकडे जबाबदारी निश्चित करण्यात यावी अथवा तिन्ही विभागांनी एकत्रित कारवाई करावी, अशी मागणी श्री.केळकर यांनी केली. यावर उत्तर देताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काही ठिकाणी अधिकाऱ्यांना हाताशी धरून कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याची कबुली दिली. या प्रकरणी आर्थिक दंड आकारण्याऐवजी शिक्षा भोगण्याची तरतूद करण्याची गरज व्यक्त केली. ठाण्यात कांदळवन उद्धस्त करून त्यावर बांधकामे होत असतील तर आमदार संजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणी चौकशी समिती नेमून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे श्री.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

घड्याळ घालणार तर पगार मिळणार, प्रशासनाचा इशारा

(पान १ वरून) कर्मचाऱ्यांवर वॉच ठेवण्याबरोबरच हे ट्रॅकर कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची देखील काळजी घेणार आहे. तीन वर्षापूर्वी ही योजना राबवण्यात आली आहे. परंतु दोन वर्षे कोरोना गेल्यानंतर या योजनेला काहीमा विलंब लागला आहे. आता बहुतांश सर्व कर्मचाऱ्यांना या डी-जीटल ट्रॅकर घड्याळ देण्यात आले खरे, मात्र केवळ ५० टक्के कर्मचारीच हे घड्याळ हातात घालत असल्याने पालिकेला केवळ ५० टक्केच कर्मचाऱ्यांना वॉच ठेवता येत आहे. उर्वरित कर्मचारी घड्याळ घालतच नसल्याने या कर्मचाऱ्यांवर वॉच ठेवायचा कसा? असा प्रश्न पालिका प्रशासनासमोर निर्माण झाला आहे.

नवी मुंबईत गणेश नाईक आणि शिंदे गट यांच्यात मोठा वाद

(पान १ वरून) नाईक अस्वस्थ ? – नवी मुंबईत गणेश नाईक यांच्या मतदारसंघावरच शिवसेना शिंदे गटानं दावा केलाय. लोकसभेला शिंदे गटाच्या उमेदवाराला मोठी आघाडी ऐरोलीतून दिली तसेच या मतदारसंघात शिंदे गटाचे नगरसेवक जास्त निवडून आले होते असं सांगत शिंदे गटानं नाईकांच्या जागेवर दावा सांगितलाय. त्यामुळे भाजप आणि शिंदे गट यांच्यात नवी मुंबईत वाद उफाळून येण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्या पारंपारिक वादाची किनार या वादाला असल्याचीही चर्चा आहे. दोनच दिवसांपूर्वी भूखंडाच्या प्रश्नावरुन गणेश नाईक यांनी सभागृहात जोरदार बॅटिंग केली होती. अप्रत्यक्षपणे त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांवरच निशाणा साधल्याची चर्चा आहे. नवी मुंबईतील कुरघोड्यावरुन नाईक अस्वस्थ असल्याचंही बोललं जातंय.

विधानसभेत अस्तित्वाची लढाई – नवी मुंबईतील दोन्ही विधानसभा मतदारसंघांत नाईक कुटुंबीयांना उमेदवारी मिळावी यासाठी नाईकांचा आग्रह आहे. यापूर्वी सलग दहा वर्षे स्वत: नाईक आणि संदीप नाईक यांनी बेलापूर, ऐरोली विधानसभा क्षेत्राचे प्रतिनिधित्व केले आहे. मागील दहा वर्षांत मात्र नाईकांना दुय्यम भूमिका घ्यावी लागली आहे. या काळात त्यांच्या विरोधकांची ताकद आणि संख्याही वाढली आहे. मुख्यमंत्र्यांच्या कृपेने नाईकांचे कडवे विरोधक आर्थिकदृष्ट्या बलशाली झाले आहेत. नाईकांचा एक कट्टर विरोधक तर महापालिकेतील २७० कोटींची कामे आपल्याकडे आहेत हे टिपेच्या सुरात नवी मुंबईत सांगत असतो. ही परिस्थितीची बदलायची असेल तर यंदाची विधानसभा निवडणूक नाईकांसाठी करो वा मरो प्रकारची आहे. बेलापूर मतदारसंघात नाईकांचे सुपुत्र संदीप नाईक त्या दृष्टीने कामालाही लागले आहेत. स्वपक्षाचा विरोध, उमेदवारी देताना भाजपचे नियम, घरच्या मैदानातच वाढते विरोधक आणि मुख्यमंत्र्यांकडूनच कोंडी होत असल्याच्या भावनेमुळे अस्वस्थ झालेल्या नाईकांनी विधानसभेत दिलेला 'आवाज' आगामी संघर्षाची नांदी मानली जात आहे.

नाईक आक्रमक का होत आहेत? – एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद आल्याने मुंबई महानगर प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांचे समर्थक आणि निकटवर्तीयांचा मुक्त वावर सुरू झाला आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोक्याच्या पदांवर पाठविण्यात येणारे अधिकारी, निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या मोहऱ्यांच्या चाली या ठाण्याहून ठरविल्या जातात. नवी मुंबई पालिकेवर १९९५ पासून नाईकांची सत्ता आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यापासून शिपायापर्यंत अनेकांनी नाईकांच्या कृपेने एके काळी 'अच्छे दिन' अनुभवले आहेत. हे चित्र गेल्या पाच वर्षांत पूर्णपणे पालटले आहे. आपल्या समर्थकांची साधी साधी कामे करून घेण्यासाठी देखील नाईकांना महापालिका मुख्यालयात जोडे झिजवावे लागतात. भाजपच्या शहरातील आमदार मंदा म्हात्रे आणि नाईकांमध्ये विस्तवही जात नाही. मुख्यमंत्र्यांकडून मंदाताईंसाठी निधीची पोतडी खुली करून दिली जाते. त्या म्हणतील ती कामे मुख्यमंत्री करतात. हेदेखील नाईक समर्थकांच्या अस्वस्थतेचे मोठे कारण आहे.

मल्टी एक्सल ट्रक बंद–घोडबंदरच्या वाहतुकीचे तीनतेरा

(पान १ वरून) पडलेला ट्रक क्रेनच्या सहाय्याने बाजूला केल्याने वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. ठाण्याच्या घोडबंदर रोडवर शुक्रवारी सकाळी ७-३० वाजण्याच्या सुमारास घोडबंदर रोडवरील आनंद नगर सिग्नल येथे मल्टी एक्सल ट्रक बंद पडला. या घटनेने या मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. घोडबंदर रोडवर घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तर घोडबंदरच्या वाहतूक कोंडीचा आणि मल्टी एक्सल ट्रक बांध पडल्याचा फटका ठाणे शहरापर्यंतच्या वाहतुकीला फटका बसला. वाहनांच्या अनेक किलोमीटर रांगा लागलेल्या होत्या. या वाहतूक कोंडी एका वाहिनीवर असताना ठाण्याकडे जाणाऱ्या वाहिनीवरून विरुद्ध दिशेने वाहनांनी मार्गक्रमण करण्यास सुरुवात केल्याने ठाण्याकडे जाणाऱ्या वाहिनीचाही चक्क जॅम झाला होता. घटनेची माहिती मिळताच ठाणे पोलीस वाहतूक शाखेचे उपायुक्त डॉक्टर विनय राठोड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांना एका क्रेनच्या सहाय्याने या मल्टी एक्सेल ट्रकला तब्बल तीन तासांनी साडे दहा वाजता तिथून बाहेर काढण्यात यश आले. या कालावधीत वाहतूक कोंडी सुटावी यासाठी वाहतूक पोलिसांनी पर्यायी मार्गही वाहनांना उपलब्ध करून दिला होता. घोडबंदरकडे जाणाऱ्या वाहिनीवर ७-३० वाजता बंद पडलेला मल्टी एक्सल ट्रक हा १० वाजता वाहतूक पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने बाजूला केला आणि वाहतूक कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. दरम्यान तब्बल ५ तास हा वाहतुकीचा जाम ठाणेकर आणि वाहन चालकाला सोसावा लागला. दहा ते पंधरा मिनिटांचे अंतर कापण्यासाठी वाहन चालकांना दीड ते दोन तासाचा कालावधी लागत होता. परिणामी कामावर जाणाऱ्या नागरिकांचे प्रचंड हाल झाले. एकंदरीत संपूर्ण ठाणे शहर ह्या एका वाहनाच्या बंद पडल्याने शुक्रवारी सकाळी वाहतूक कोंडीत अडकल्याचे दिसून आले.

तब्बल तीन तासापेक्षा जास्त काळ वाहतूक कोंडीत अडकलेले चाकरमानी आणि वाहनचालक यांनी शुक्रवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमर्स सुटकेचा निश्वास सोडला. दरम्यान मल्टी एक्सल ट्रॅकवर मोठ्या प्रमाणात हेवी सामान असल्याने वाहतूक पोलिसांची पंचाईत झाली. वाहतूक पोलिसांनी त्वरित क्रेनची व्यवस्था करीत मल्टी एक्सल ट्रक रस्त्याच्या बाजूला करण्यात आला आणि वाहतुकीची कोंडी फोडण्यात आली. तर ठाणे शहरापर्यंत वाहतूक कोंडीचा फटका बसल्याने मल्टी ट्रक चालकाच्या विरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दिव्यात ५० हजारांची खंडणी प्रकरणी दोघांना अटक

(पान १ वरून) खर्डी गाव, ठाणे येथे आरोपी १) गोवर्धन हनुमान पाटील, वय ४१ वर्षे, २) गणेश सुधाकर शिंपी उर्फ सन्नी वय ४० वर्ष यांना ३०,०००/- रूपये स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. असून त्यांचे विरोधात तकादार गणपत म्हात्रे यांचे तकारीवरून शिळडायघर पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम ३०८ (२), ३०८(३). ३०८(४), ३०८ (५) प्रमाणे दिनांक ०३/०७/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयातील आरोपींना मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने सदर आरोपींना दिनांक ०९/०७/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. २८१९२८२८

बांधकाम / विद्युत विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/साबां/निविदा/०६/२०२४-२५ दि. ०५/०७/२०२४

// निविदा सुचना क्र. ०६ //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ०६ विकास कामे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरूध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरू आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. १०/०७/२०२४ ते दि. १८/०७/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळ येथे वर दि. १९/०७/२०२४ रोजी पर्यंत दु. १२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि. २२/०७/२०२४ रोजी दु. १२.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

जा. क्र. मनपा/मावज/ - २२८५६६५/२०२४-२५
दि. ०५/०७/२०२४

सही/-
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

ठिकाण : भाईंदर
दिनांक : ०५/०७/२०२४

राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

■ जागा : ४८
■ पदाचे नाव तपशील:
१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc. (CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/PWD: 175/-
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

भंडारा ऑर्डनन्स फॅक्टरी

■ जागा : १५८
■ पदाचे नाव तपशील:
१ कार्यकाळ आधारित DBW (डेंजर बिल्डिंग वर्कर) १५८
■ शैक्षणिक पात्रता: AOCP ट्रेड (NCTVT) चे माजी प्रशिक्षणार्थी ज्यांना ऑर्डनन्स फॅक्टरी प्रशिक्षण / लष्करी दारूगोळा आणि स्फोटकांच्या निर्मिती आणि हाताळणीचा अनुभव आहे. आणि पूर्वीच्या आयुध निर्माणी मंडळाच्या आयुध कारखान्यांमध्ये प्रशिक्षण घेतलेले AOCP ट्रेडचे एक्स-ट्रेड अप्रेंटिस. किंवा NCTVT (आता NCVT) द्वारे जारी केलेले NAC/NTC प्रमाणपत्र असलेले उमेदवार आणि सरकारशी संलग्न असलेल्या सरकारी/खाजगी संस्थेकडून AOCP ट्रेडमध्ये आणि सरकारी ITI मधून AOCP असलेले उमेदवार विचारात घेतले जातील.
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १८ ते ३५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: भंडारा
■ फी : फी नाही.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Chief General Manager, Ordnance Factory Bhandara District: Bhandara Maharashtra, Pin-441906
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाइट https://ddpdoo.gov.in/units/OFBA

स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM²)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

हिंदुस्तान कॉपर लिमिटेड

■ Total: ५६
■ पदाचे नाव तपशील:
ज्युनियर मॅनेजर माइनिंग इलेक्ट्रिकल
कंपनी सेक्रेटरी
फायनान्स
HR
■ शैक्षणिक पात्रता: माइनिंग/इलेक्ट्रिकल डिप्लोमा + ०५ वर्षे अनुभव किंवा माइनिंग/इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी+ ०२ वर्षे अनुभव किंवा पदवीधर+ ०५ वर्षे अनुभव/CA किंवा PG पदवी/ डिप्लोमा(Finance/HR) PG MBA (Finance/HR) + ०२ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोलकाता
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST: फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ जुलै २०२४
■ वेबसाईट https://www.hindustancopper.com/

पॅरिस ऑलिम्पिकसाठी २८ सदस्यीय ॲथलेटिक्स संघाची घोषणा

भारतीय थलेटिक्स फेडरेशनने२६ जुलैपासून सुरू होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी २८ सदस्यीय भारतीय थलेटिक्स संघाची घोषणा केली आहे. टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. यावेळी नीरज चोप्रासोबत किशोर जेना हा ही भाला फेकताना दिसणार आहे. गेल्या वर्षी आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी अन्नू राणी महिलांच्या भालाफेक स्पर्धेत भाग घेणार आहे. २८ जणांच्या या थलेटिक्स संघात १७ पुरुष, ११ महिला खेळाडूंचा समावेश आहे.

नीरज करणार नेतृत्व

पॅरिस ऑलिम्पिक २६ जुलैपासून सुरु होणार असून सांगता ११ ऑगस्टला होणार आहे.
या स्पर्धेसाठी जगभरातील खेळाडू सज्ज झाले आहेत.
नीरज चोप्रा २८ सदस्यीय भारतीय थलेटिक्स संघाचे नेतृत्व करणार आहे.
त्याने नुकतेच फिनलंडमध्ये झालेल्या पावो नुर्मी गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकले आहे.

टोकियो ऑलिम्पिकमधील ८ खेळाडूंचा सहभाग

नीरज चोप्रा आणि अन्नू राणी व्यतिरिक्त पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस थलीट अविनाश साबळे, आशियातील अव्वल शॉट पुटरपैकी एक तजिंदरपाल सिंग तूर, महिला रेस वॉकर प्रियांका गोस्वामी आणि ४x४०० मीटर रिले धावपटू मोहम्मद अनस, अमोज पार्टिकन टू सुब्बा जॅकोटेड तीन वर्षांपूर्वी टोकियोमध्ये सहभागी झाले होते. अनसचे हे सलग तिसरे ऑलिम्पिक असणार आहे.
पारुल चौधरी ३००० मीटर स्टीपलचेस आणि ५००० मीटर शर्यतीत सहभागी होणार आहे. दोन वैयक्तिक स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी निवडलेली ती एकमेव खेळाडू आहे. गेल्या वर्षी तिने आशियाई क्रीडा स्पर्धेत ५००० मीटर शर्यतीत सुवर्णपदक तर ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये रौप्यपदक पटकावले होते. राष्ट्रीय विक्रमवीर अक्षदीप सिंग, विकास सिंग आणि परमजीत सिंग बिश्त पुरुषांच्या २० किमी रेस वॉक स्पर्धेत भाग घेतील. तर सूरज पनवार मिश्र मॅरेथॉन स्पर्धेत प्रियंका गोस्वामी सोबत सहभीगी होईल.

पुरुष संघ :

अविनाश साबळे (३,००० मीटर स्टीपलचेस), नीरज चोप्रा, किशोर कुमार जेना (भालाफेक), तजिंदरपाल सिंग तूर (शॉट पुट), प्रवीण चित्रवेल, अब्दुल्ला अबुबकर (ट्रिपल जंप), अक्षदीप सिंग, विकास सिंग, परमजीत सिंग बिश्त (२० किमी वॉक रेस), मुहम्मद अनस, मुहम्मद अजमल, अमोज जेकब, संतोष तमिलरासन, राजेश रमेश (४x४०० मीटर रिले), मिजो चाको कुरियन (४x४०० मीटर रिले), सूरज पनवार (वॉक मिक्स्ड मैराथन), सर्वेश अनिल कुशारे (उंच उडी).

महिला संघ :

किरण पहल (४०० मीटर), पारुल चौधरी (३,००० मीटर स्टीपलचेस आणि ५,००० मीटर), ज्योती याराजी (१०० मीटर अडथळा), अन्नू राणी (भालाफेक), आभा खटुआ (शॉट पुट), ज्योतिका श्री दांडी, सुभा व्यंकटेशन, विठिया रामराज, पूवम्मा एमआर (४x४०० मीटर रिले), प्राची (४x४००मी), प्रियांका गोस्वामी (२० किमी वॉक रेस).

सोनाक्षी सिन्हा-रितेशच्या 'काकुडा' चित्रपटाचा ट्रेलर

झी ५ ने भय-विनोदीपट काकुडाचा ट्रेलर प्रदर्शित केलाय. आदित्य सरपोतदार दिग्दर्शित आणि RSVP निर्मित या कलाकृतीत सोनाक्षी सिन्हा, रितेश देशमुख, साकिब सलीम आणि आसिफ खान झळकणार आहेत. या ट्रेलरमध्ये रतोडी गावाला भेडसावणाऱ्या विचित्र शापाची एक चित्तवेधक झलक दिसते. काकुडाचा प्रीमियर १२ जुलै रोजी होणार आहे.

ट्रेलरमध्ये दाखविल्याप्रमाणे, काकुडा'मध्ये सनीची भूमिका साकारणारा साकिब सलीम हा एक कमी शिकलेला माणूस आहे, जो सोनाक्षी सिन्हाने साकारलेल्या इंदिराच्या प्रेमात पडतो. एकत्र राहण्याचा निर्धार करून, ते लग्न करतात आणि काकुडा'च्या शापाने झपाटलेल्या रतोडी गावात जातात. त्यांच्या लग्नाच्या रात्री, सनी 'काकुडा'साठी संध्याकाळी सव्वा सात वाजता लहान दरवाजा उघडण्यात अयशस्वी होतो, 'काकुडा'ला आयतेच आमंत्रण मिळते. हे एक दुष्ट भूत, जे घरच्या माणसाला पाठीवर कुबड देऊन शिक्षा करतो. शापित मनुष्य तेराव्या दिवशी मृत होतो. सनीच्या आयुष्याची दोरी अधांतरी लटकत असताना, इंदिरा ही रितेश देशमुखने साकारलेल्या विचित्र भूत शिकारी, व्हिक्टरची मदत मागते.

सरपोतदार म्हणाले, 'काकुडा'चा ट्रेलर म्हणजे आम्ही तयार केलेल्या एका अनोख्या लोककथेच्या आकर्षक कथानकाची फक्त एक झलक आहे. हा एक मजेदार, भीतीदायक आणि अविस्मरणीय अनुभव ठरेल.
रितेश देशमुख म्हणाला, 'काकुडा'च्या विचित्र आणि विलक्षण जगाचा भाग बनण्याची संधी मला मिळाली म्हणून रोमांचित वाटते. व्हिक्टर या अपारंपरिक भूत शिकारीची भूमिका साकारलीय. मी आतापर्यंत साकारलेल्या पात्रांपेक्षा हे पात्र निराळे आहे. यामुळेच ते इतके रोमांचक वाटते. सोनाक्षी सिन्हा आणि साकिब सलीम यांच्यासारख्या प्रतिभावान सहकलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी आभारी आहे.'
सोनाक्षी सिन्हा म्हणाली, 'काकुडा'मध्ये मी अंधविश्वासावर नव्हे तर विज्ञानावर विश्वास ठेवणाऱ्या मुलीची भूमिका साकारत आहे. तथापि, जेव्हा तिला या विचित्र स्थितीचा सामना करावा लागतो, तेव्हा ती अधिक खोलवर जाऊन त्यामागील सत्य जाणून घेण्याचे ठरवते. मला हे मान्य करावेच लागेल की, भय आणि विनोद यांच्यातील समतोल साधणे हे एक आव्हानात्मक काम आहे. लोकांना हसवणे सोपे नसते. माझे सहकलाकार रितेश, साकिब आणि आसिफ, सगळे वास्तविक जीवनातही इतकेच मजेदार आहेत.'

कर्करोगास प्रतिबंध करण्यासही फणस गुणकारी

नवी दिल्ली : फणसाचे गोड गरे खाणे कुणाला आवडत नाही? भारत, इंडोनेशियासह अनेक देशांमध्ये फणस आवडीने खाल्ला जातो. फणसाच्या गर्यांबरोबरच त्याच्या बियाही उकडून किंवा भाजी करून खाल्ल्या जातात. मात्र केवळ चवीसाठीच नव्हे, तर विविध पोषक घटकांसाठीही फणस महत्त्वाचा ठरतो. फणसातील काही पोषणतत्त्वांबद्दल जाणून घेऊ.

कर्करोग प्रतिबंधासाठी फणस औषधी

१०० ग्रॅम फणसामध्ये दैनंदिन आवश्यकतेच्या २५ टक्के इतकं 'क' जीवनसत्त्व असतं. तसेच १५ टक्के इतकं पोटॅशियम असतं. सध्या विगन आहार पद्धती अवलंबिणार्यांसाठी कच्च्या फणसाची भाजी 'विगन मीट' म्हणजे मांसाहाराला पर्याय म्हणून खाल्ली जाते. फणसातील जॅकलिन आणि सॅपोनीन यामुळे कोणत्याही प्रकारच्या ट्युमरची वाढ होत नाही आणि कर्करोग प्रतिबंधासाठी देखील फणस औषधी मानला जातो. फणसातील ल्युटीन, झियाझानथिन, कॅरोटिनॉइड्स डोळ्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. किंबहुना, वयपरत्वे दृष्टी कमी होऊ नये म्हणून फणसाचे गरे आहारात असणे आवश्यक आहे.
मलावरोध रोखण्यासाठी फणस खाणे उपयुक्त
फणसात असणारे तंतुमय पदार्थ पाचक मानले जातात. मलावरोध रोखण्यासाठी फणस खाणे उपयुक्त ठरते. अनेकदा आहार नियमन करताना फणसाचे काप, गर्यांचे चिप्स खाण्याबद्दल प्रश्न विचारले जातात. फणस फळ म्हणून खाताना मिळणारे पोषक फायदे तळण्याच्या प्रक्रियेमध्ये साधारण शून्य होऊन जातात. फणसात असणारे 'क' जीवनसत्त्वाचं प्रमाण कमी होतं. व्यायाम करणार्यांसाठी उत्तम ऊर्जा देणार तसेच बर्याचअंशी 'ब' जीवनसत्त्वाचं अधिक प्रमाण असणारा फणस खेळाडूंसाठी मात्र अत्यंत उपयुक्त फळ आहे. 'वेगन' म्हणजेच वनस्पतीजन्य आहार करू इच्छिणार्यांसाठी फणस सगळ्याच पोषकतत्त्वांसाठी उत्तम पदार्थ आहे. फणसाच्या गर्यांचे त्यातील पाणी काढून तयार केले जाणारे पीठ, बियांपासून तयार केले जाणारे पीठ शाकाहारी आहारात पोषक मानले जाते.

नाशपाती हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे.

पावसाळ्यात, विशेषतः आषाढ-श्रावण महिना सुरू होताच नाशपाती हे फळ बाजारात मिळण्यास सुरुवात होते. त्याला इंग्रजीत 'पिअर' असे म्हणतात. 'पिअर' हे नाव त्याच्या आकारावरून पडले आहे. हे फळ वरच्या बाजूला निमुळते आणि खाली लंबगोलाकार असते. नाशपाती हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. यामध्ये व्हिटॅमिन-सी भरपूर प्रमाणात असते. जे रोगप्रतिकात्मक शक्ती वाढवते. पावसाळ्यामध्ये व्हिटॅमिन 'सी' युक्त फळे आणि भाज्या खाण्याचे सल्ले दिले जातात. कारण, या ऋतुमध्ये आजार वाढत असतात. याकरिता योग्य आहार असणे आवश्यक असते. पावसाळ्यात आजाराचा धोका कमी करण्यासाठी नाशपाती मदत करते. यामध्ये व्हिटॅमिन 'सी' शिवाय पोटॅशियम, फोलेट, कॉपर आणि मॅगनीज असते. जाणून घ्या या फळाचे फायदे...

मधुमेह नियंत्रित करते

नाशपाती मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर असते. नाशपातीमध्ये एंथोसायनिन असते. जे अँटिऑक्सीडेंटचे काम करते आणि मधुमेहाचा धोका कमी करते.

हृदयासाठी फायदेशीर

नाशपातीमध्ये जे पोषकतत्वे असतात ते हृदयाला आरोग्यदायी ठेवतात. नाशपातीमध्ये प्रोसायनिडिन असते, जे एक अँटिऑक्सीडेंटचे काम करते. यामुळे हृदयाशी संबंधित समस्या दूर होतात.

सुज कमी करते

नाशपाती मध्ये व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के असते जे शरीराची सूज कमी करण्यासाठी मदत करते. तसेच नाशपातीमध्ये फ्लेवोनोइड्स अँटिऑक्सीडेंट असतात.

पाचनतंत्र मजबूत बनवते

नाशपातीमध्ये भरपूर फाइबर असते. ज्यामुळे पोट आणि पाचन संबंधित समस्या दूर होतात. जर तुम्हाला बद्धकोष्ठतेची समस्या असेल तर नाशपाती जरूर खावे.

वजन कमी करण्यासाठी मदत करते

नाशपातीचे सेवन केल्यास वजनदेखील कमी होण्यास मदत होते. यामध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते. ज्यामुळे भूक कमी लागते. नासपती खाल्यास लठ्ठपणा कमी होण्यास मदत होते.

रक्ताभिसरण

नाशपातीमध्ये लोह पुरेशा प्रमाणात आढळते. ज्यामुळे शरीरातील रक्ताभिसरण वाढते आणि अशक्तपणा, थकवा इत्यादी समस्या कमी होण्यास मदत होते. रक्तासोबतच योग्य प्रमाणात ऑक्सिजनही शरीरात पोहोचतो. त्यामुळे सर्व अवयव योग्य प्रकारे काम करू शकतात.

विषारी घटक बाहेर काढते

नाशपाती हे रसाळ फळ आहे, ज्यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते. हे आतड्यांमधून आणि यकृतातून विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते. याच्या मदतीने तुमचे शरीर दररोज स्वच्छ केले जाऊ शकते. यामध्ये पोटॅशियमचे प्रमाण चांगले असते, जे शरीरातून सोडियम काढून टाकते आणि रक्तदाबाची समस्या टाळते.

कुडूस जिल्हा परिषद मतदारसंघात शेकापला अखेरची घरघर

पेण : कुसुंबळे गावातील शेतकरी कामगार पक्ष संपूष्ठात अलिबाग तालुक्यामध्ये लोकसभा निवडणूकीमध्ये अलिबाग मुरुड-रोहा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार महेद्रशेठ दळवी शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख राजा भाई केणी यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे उमेदवार सुनिलजी तरकर यानी ३९ हजार समंताची आघाडी दिल्या नंतर तालुक्यात उरला सुरक्षा शेतकरी कामगार पक्ष शेवटची घटका मोजत असतानाच कुईस जिल्हा परिषद मतदार संघातील कुसुंबळे गावातील शेकडो ग्रामस्थांनी आमदार महेद्र शेठ दलवी व जिल्हा प्रमुख राजाभाई केणी याच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.
यावेळी ध्रुव काशिनाथ ठाकूर, जिनेश ध्रुव ठाकूर, हितेश ध्रुव ठाकूर निता ध्रुव ठाकूर, हर्षदा जितेश ठाकूर, जयराम ठाकूर, प्रणय परीलि भूषण रामचंद्र पतिल, विठठल धर्मा धुमाळ, प्रणित नाईक, प्रज्वल उदयनाईक रघुनाथ नाटायण पतिल, बाळाराम नाईक, संतोष नाईक, सखाराम नाईके. निकेश नाईक, अमीर नाईक, दिपक पवार किशोत्यवार, सचिन माइक लक्ष्मण पवार, राम नानू नाईक, बचन नाईक, विठ्ठल पवार, यांनी पक्ष प्रवेश केला.
कुसुंबळे आदीवासी वाडी पक्ष प्रवेश वेळी उपस्थीतीती गटनेत्या मानसीलाई दळवी, जिल्हा प्रमुख राजाभाई केणी, जीवन पाटील, उत्तमशेठ मन्मय पाटील, हृदयनाथ पाटील प्रमोद पाटील, अनिकेत पायल शैलेश पाटील, प्रतीक पाटील.अनिश नाईक हे उपस्थित होते.

कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील

वाहन कोंडीने प्रवासी हैराण

कल्याण : कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळ स्मार्ट सिटी प्रकल्पातून उड्डाण पूल, वाहनतळ आणि इतर बहुद्देशीय प्रकल्प उभारणीची कामे कल्याण डोंबिवली पालिकेकडून सुरू आहेत. ही विकास कामे अतिशय संथगतीने सुरू असल्याने अलीकडे त्याचा फटका रेल्वे स्थानक भागात येणाऱ्या रिक्षा, खासगी मोटारी, दुचाकीस्वार यांना वाहन कोंडीच्या माध्यमातून बसत आहे.
उल्हासनगर, विस्तारित कल्याण, भिवंडी परिसरातून नोकरदार वर्ग रिक्षा, खासगी वाहनाने कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागात सकाळच्या वेळेत येतात. अनेक वेळा या भागात वाहतूक पोलीस, वाहतूक सेवक नसल्याने वाहनचालक आडवीतिडवी वाहने रस्त्यावर चालवून वाहतूक कोंडी निर्माण करत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.
छाया सिनेमा ते कल्याण रेल्वे स्थानकापर्यंत येण्यासाठी अनेक वेळा अर्धा तास लागतो. या कोंडीमुळे निश्चित वेळेतील लोकल निघून जातात. कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागात अरुंद रस्ते आहेत. पदपथ, त्या लगतचे रस्ते फेरीवाल्यांनी व्यापून टाकलेले असतात. आयुक्तांनी आदेश देऊनही पालिकेकडून या फेरीवाल्यांवर कारवाई केली जात नाही. जुजबी कारवाई करून पालिकेचे फेरीवाला हटाव पथक फेरीवाल्यांची पाठराखण करत असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या.
वाहन कोंडी टाळण्यासाठी कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागातील अनेक रस्ते एक दिशा मार्ग केले आहेत. त्यामुळे वाहन चालकांना वळसा घेऊन इच्छित स्थळी जावे लागते. या एक दिशा मार्गिकांची अंमलबजावणी योग्यरितीने होत नाही. त्यामुळे अनेक वाहनचालक उलट दिशेने या मार्गात येऊन वाहन कोंडी करतात.
लोकल, लांब पल्ल्याच्या गाड्या कल्याण रेल्वे स्थानकातून धावतात. वेगवेगळ्या प्रांतामधून नागरिक या शहरात येतात. शिळफाटा, मुरबाड, भिवंडी परिसरात प्रवासी वाहतूक करणारी प्रवासी वाहने रेल्वे स्थानकाजवळून धावतात. मागील पाच ते सहा वर्षांपासून स्मार्ट सिटी प्रकल्पाचे काम कल्याण रेल्वे स्थानक भागात सुरू आहे. ते लवकर पूर्ण करण्याची प्रवाशांची मागणी आहे. वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी कल्याण रेल्वे स्थानक भागातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी याठिकाणी सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत वाहतूक पोलीस तैनात असतात, असे सांगितले.

> कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागातील स्मार्ट सिटी प्रकल्पातील कामे मागील पाच वर्षांपासून संथगतीने सुरू आहेत. ही कामे लवकर पूर्ण करून प्रवाशांची वाहन कोंडीतून पालिका प्रशासनाने मुक्तता करावी.
> - योगेश दळवी, प्रवासी, कल्याण.

वसईतील घरांना सर्वेक्षणाच्या नावाखाली वाढीव घरपट्टी

आमादार राजेश पाटील यांचा विधानसभेत आरोप

वसई : वसई विरार मधील जुन्या ग्रामपंचायत हद्दीत सर्वेक्षणाच्या नावाखाली वाढीव घरपट्टी लावण्यात येत असून ती तोडण्याची कारवाई करत असल्याचा आरोप आमदार राजेश पाटील यांनी गुरूवारी विधानसभेत केला. हे सर्वेक्षण थांबवावे आणि ज्या घरांना वाढीव घरपट्टी लावण्यात आली आहे ती रद्द करावी अशी मागणी त्यांनी केली. ही माहिती तपासून पटलावर ठेवली जाईल, असे उत्तर उद्योग मंत्र्यांनी दिले.

वसई विरार शहरात १ लाख ४२ हजार इतक्या व्यावसायिक मालमत्ता आहेत. यापैकी अनेकांनी बेकायदेशीरपणे वाढीव बांधकामे केली आहेत. गाळ्यांमध्ये, गोदामात पोटमाळे काढून त्याचा व्यावसायिक वापर केला जात आहे. अनेक मालमत्तांनी कमी क्षेत्रफळाला कर आकारणी झाल्यानंतर वाढीव बांधकामे केली आहेत. यामुळे पालिकेचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. त्यामुळे मालमत्ता कर वाढीसाठी वसई विरार महापालिकेकडून प्रथमच शहरातील व्यावसायिक मालमत्तांचे जीआयएस या प्रणालीद्वारे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. प्रथमच पालिकेकडून अशा प्रकारचे सर्वेक्षण केले जात आहे. हे काम मेसेर्स सीई इन्फो सिस्टीम लिमिटेड या कंपनीला देण्यात आले आहे. या सर्वेक्षणासाठी ३५ जणांची १७ पथके तयार करण्यात आली आहेत.
मात्र या सर्वेक्षणाच्या नावाखाली जुन्या ग्रामपंचायतीमधील घरांना वाढीव घरपट्टी आकारली जाते तसेच ती तोडण्याची कारवाई केली जात असल्याचा आरोप बोईसरचे आमदार राजेश पाटील यांनी गुरूवारी विधानसभेत केला. पालिकेत सध्या प्रशासकीय राजवट आहे. ते मनमानी पध्दतीने असे सर्वेक्षण करत असून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरत असल्याचा आरोप केला. सध्या सुरू असलेले हे सर्वेक्षण थांबवावे तसेच घरांना लावलेली वाढीव घरपट्टी रद्द करावी अशी मागणी त्यांनी सभागृहात केली. उद्योग मंत्री उदय सामंत यांनी यासदर्भातील माहिती तपासून पटलावर ठेवली जाईल, असे उत्तर सभागृहात दिले.
सध्या सुरू असलेले सर्वेक्षण हे केवळ वाणिज्यक आणि व्यावसायिक आस्थापनांनी केलेल्या वाढीव बांधकामांचे केले जात असल्याचे पालिकेचे उपायुक्त (कर) गणेश शेटे यांनी सांगितले.

मिरा भाईंदर पालिका आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली

अनधिकृत पान टपऱ्या आणि दुकानांविरोधात कारवाई मोहिम

भाईंदर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार व मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली मिरा भाईंदर शहरातील शाळा महाविद्यालय आणि धार्मिक स्थळे यांच्या १०० मीटर परिघातील तंबाखू, गुटखा आणि सिगारेट सारखे नशायुक्त पदार्थांच्या विक्रीवर प्रतिबंध आणण्याकरीता मिरा भाईंदर महागरपालिका व पोलिस प्रशासनातर्फे संयुक्तपणे विशेष मोहिम राबविली जात आहे. या मोहिमेअंतर्गत ९२ पान टपऱ्या आणि दुकानां विरोधात तीव्र कारवाई केली असून ६२ टपरी चालक आणि दुकान धारकांवर पोलिस प्रशासनामार्फत COPTA कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आणि ही मोहिम या पुढे ही अशीच निरंतर चालू राहणार आहे.
शहरातील शाळा, महाविद्यालय आणि धार्मिक स्थळे यांना १०० मीटर परिघाचे सीमारेषा आखून देण्यात आलेला आहे. या सीमेरेषेच्या आतील पान टपऱ्या आणि दुकानांविषयी माहिती जर नागरिकांनी मिरा भाईंदर महानगपालिका प्रशासन आणि पोलिस प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यास त्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
तरी शहरातील सर्व शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पालकांना व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, शाळा, कॉलेज आणि धार्मिक स्थळांच्या परिसरातील तंबाखूजन्य पदार्थाच्या विक्रीबाबत कोणतीही बाब आपल्या निदर्शनास आल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या १८००२२४८४९ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी. आणि आपल्या शहराला नशा मुक्त करण्यास सहकार्य करावे.

नवी मुंबई पोलीस भरतीची लेखी परिक्षा रविवारी ७ जुलैला

पनवेल : नवी मुंबई पोलीस शिपाई संवर्गातील १८५ पदांसाठीची भरती प्रक्रियेचा दूसरा महत्वाचा टप्पा म्हणजे लेखी परिक्षा रविवारी ७ जुलैला नवी मुंबईतील वाशी येथील 'सिडको एक्झीबीशन सेंटर'मध्ये होणार आहे. रविवारी सकाळी साडेनऊ ते साडेदहा या दरम्यान ही परिक्षा होणार असली तरी पात्र उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर सकाळी ७ वाजता उपस्थित राहण्याची सूचना नवी मुंबई पोलीसांतर्फे करण्यात आली आहे. या लेखी परिक्षा केंद्राच्या आत आणि बाहेर सीसीटिव्ही कॅमेरांच्या माध्यमातून उमेदवारांवर बारीक लक्ष्य ठेवण्यात येणार आहे.

नवी मुंबई पोलीस दलातील पोलीस शिपाई या १८५ पदांसाठीची भरती प्रक्रियेसाठी तब्बल ५,९८४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. भरती प्रक्रियेला १९ जूनपासून सूरुवात झाली होती. मात्र पावसामुळे मैदानाची दुर्दशा झाल्यानंतरही पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या नेतृत्वामुळे भरती प्रक्रिया राबविणा-या समितीने उमेदवारांना अधिकाधिक सुविधा दिल्यामुळे एकही अनुचित प्रकार या भरती प्रक्रियेमध्ये झाल्याची नोंद नाही. २७ जूनला मैदानी परिक्षा संपल्यानंतर ५,९८४ मधून १,८४२ पात्र उमेदवार लेखी परिक्षेसाठी निवडण्यात आले.
यामध्ये १३९९ पुरुष आणि ४४३ महिला तसेच माजी सैनिक ७१ अशा उमेदवारांचा समावेश असल्याची माहिती नवी मुंबई पोलीस मुख्यालयाचे पोलीस उपायुक्त संजय पाटील यांनी दिली.
मैदानी चाचणीप्रमाणे लेखी परिक्षेवेळी उमेदवारांसाठी मोफत अल्पोपहाराची, खाद्यगृहाचे स्टॉल पोलीस विभाग आणि सेवा भावी संस्थांकडून उभारले जाणार आहेत. बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या उमेदवारांना रविवारी परिक्षा केंद्रावर पोहचण्यासाटी पनवेल, मानसरोवर आणि वाशी रेल्वे स्थानकातून शासकीय वाहनांची सोय नवी मुंबई पोलीसांनी केली आहे.
लेखी परिक्षेला येताना सोबत प्रवेशपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट साईज दोन फोटो, परिक्षेला येताना कोणतेही डिजीटल साहीत्य उमेदवारांनी सोबत आणू नये, या वस्तू परिक्षा केंद्रावर ठेवण्यासाठी कोणतीही सोय पोलीस विभागाने केली नाही.
मैदाणी चाचणी दरम्यान उमेदवारांचे बायोमॅट्रीक ठसे जुळविल्यानंतरच उमेदवारांना परिक्षा केंद्रात प्रवेश मिळेल. ही परिक्षा OMR तंत्रज्ञानावर घेण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर पालिका आयुक्त यांचा नागरिकांनी केला महापालिका मुख्य कार्यालयात सन्मान

भाईंदर : रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची एस.के. डी. बिल्डिंग येथील रहिवाश्यांनी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांचा मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात सन्मान केला. सदर प्रसंगी पत्रकार बंधू व नागरिक उपस्थित होते. पिनॅकॉलो बिल्डिंग समोरील महापालिकेच्या पिनॅकॉलो बिल्डिंग समोरील एस.के.डी. बिल्डिंगमध्ये BSUP योजने अंतर्गत व रस्ता रुंदीकरणमध्ये घर गेलेल्या नागरिकांना निवारा देण्यात आलेला आहे. तेथील नागरिकांना लिफ्ट बंद, अस्वच्छता, गटाराचे पाणी, पाण्याच्या टाकीत घाण या सर्व समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्या इमारतीमधील नागरिकांच्या तक्रारी व मिरा भाईंदर शहरातील पत्रकारांच्या माहितीनुसार आयुक्त यांनी सदर ठिकाणी भेट देऊन आढावा घेतला व अतिशय बिकट परिस्थितीत राहणाऱ्या नागरिकांना त्यांच्या मागणीनुसार सर्व कामे पूर्ण करून त्यांचे समाधान केले जाईल असे आश्वासन आयुक्त यांनी नागरिकांना दिले. नागरिकांना दिलेले आश्वासन व आयुक्त यांच्या निर्देशानुसार सदर इमारतीमध्ये लिफ्ट बंदची समस्या, अस्वच्छता असलेल्या ठिकाणी व पाण्याच्या टाकीची स्वच्छता, गटारांची स्वच्छता, परिसरातील साफसफाई तीन दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आली. दिलेल्या आश्वासनानुसार मा. आयुक्त यांनी नागरिकांच्या समस्यांचे निवारण केल्याने एस.के. डी. इमारतीमधील नागरिकांनी आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांची महापालिका मुख्यालयात भेट घेऊन त्यांचा सन्मान करून त्यांचे आभार व्यक्त केले.

सिडकोने वरिष्ठ नियोजनकार या पदांची भरती प्रक्रीया केली रद्द

पनवेल: सिडको महामंडळाने शुक्रवारी त्यांच्या संकेतस्थळावर वरिष्ठ नियोजनकार या पदांची भरती प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द केल्याची माहिती जाहीर केली आहे. राज्य सरकारचे आधिवेशन सूरु असताना अचानक भरती प्रक्रिया रद्द केल्याने उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मागील वर्षी १२ एप्रिलला सिडको मंडळाने वर्ग १ च्या संवर्गातील वरिष्ठ नियोजनकार, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), कार्यकारी अभियंता (विद्युत), सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य), सहाय्यक कार्यकारी अभियंता (विद्युत), सहाय्यक परिवहन अभियंता, अर्थशास्त्र व सहाय्यक विधी अधिकारी अशा ३७ रिक्त पदांकरीता भरतीची प्रक्रिया राबविली होती. यामध्ये वरिष्ठ नियोजनकार या एका पदासाठी भरती केली जाणार होती.
वरिष्ठ नियोजनकार या पदासाठी ७८ हजार ते २ लाख ९ हजार इतके वेतन दिले जाणार होते. तसेच खुला जातीच्या प्रवर्गातून उमेदवारांची निवड केली जाणार होती. वरिष्ठ नियोजनकार या पदा करिता अर्ज केलेल्या उमेदवाराला नगर नियोजन क्षेत्रातील किमान १० वर्षे काम केल्याचा अनुभवासोबत किमान पाच वर्षे असोशिएट नियोजनकार किंवा समकक्ष पदाचा अनुभव गरजेचा असल्याची अट सिडकोने जाहीरातीमध्ये म्हटले होते.

स्वच्छता दिंडीव्दारे करावे-सीवूड परिसरात स्वच्छता व पर्यावरणाचा संदेश प्रसारण

नवी मुंबई :'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या नामगजरात बेलापूर विभागामध्ये करावे येथील ज्ञानदीप विदयालयाच्या विदयार्थ्यांनी स्वच्छता दिंडीत मोठया संख्येने सहभागी होत स्वच्छता आणि पर्यावरणाचा संदेश प्रसारीत केला. नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत विविध स्वच्छता विषयक उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये विविध वयोगटातील नागरिक मोठया संख्येने सहभागी होत आहेत.
१७ जुलै रोजी देवशयनी आषाढी एकादशी असून श्रीविठ्ठल भेटीसाठी राज्यभरातून लाखो वारकरी दिंडया - पताका नाचवत पंढरपूरच्या दिशेने निघालेले आहेत. अशा वारीमय वातावरणात विदयार्थ्यांना वारीची परंपरा प्रत्यक्ष अनुभवता यावी व या माध्यमातून संत सज्जनांनी सांगितलेला स्वच्छता व पर्यावरण संरक्षणाचा संदेश प्रसारीत व्हावा यादृष्टीने 'स्वच्छता दिंडी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला होता. यामध्ये पाचशेहून अधिक शालेय विदयार्थी पारंपारिक वेशभूषा करुन उत्साहाने सहभागी झाले होते. यात विठ्ठल व रखुमाईच्या वेशभूषेतील विदयार्थी, संत ज्ञानेश्वर - संत तुकाराम अशा संतांच्या वेशातील विदयार्थी, छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ आणि मावळयांच्या वेशातील विदयार्थी हे या दिंडीचे आकर्षण होते.
दिंडीत सहभागी विदयार्थी समुहांनी विविध जनजागृतीपर संदेश हे त्याविषयीचे फलक प्रदर्शित करीत व घोषणा देत प्रसारित केले. काही विदयार्थी समुहांनी ओलू - सुकू व घातकू चे फलक उंचावत कचरा वर्गीकरणाचा स्वच्छता संदेश प्रसारित केला. सध्या 'सफाई हटाओ - बिमारी भगाओ' हे अभियान राष्ट्रीय स्तरावर राबविले जात असून या स्वच्छता दिंडीमध्ये आरोग्य रक्षणाचाही संदेश विदयार्थी समुहांनी तसे फलक उंचावून व घोषणा देत नागरिकांपर्यंत पोहचवला. काही विदयार्थी समुहांनी 'वृक्ष लावा- वृक्ष जगवा' असा संदेश वृक्षरोपे हातात घेऊन प्रसारित केला. वाचनाचे महत्व अधोरेखित करणाऱ्या पुस्तके हातात घेऊन फलकांव्दारे वाचनजागृती करणाऱ्या विदयार्थी समुहांची उपस्थितीही लक्षणीय होती. त्याचप्रमाणे संतांची छायाचित्रे असणारे फलक प्रदर्शित करीत महाराष्ट्राच्या संत परंपरेचाही दिंडीत जागर करण्यात आला. दिंडीत सहभागी ओलू, सुकू व घातकू या मॅस्कॉट्सची उपस्थितीही लक्षवेधी होती.
नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त शशिकांत तांडेल यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता दिंडीसारख्या आगळया वेगळया उपक्रमाप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्यासह प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, कार्यकारी अभियंता संजय दादा पाटील, स्वच्छता अधिकारी सुर्यकांत म्हात्रे आणि ज्ञानदीप सेवा मंडळ शाळेचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी आणि शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.
'सफाई अपनाओ - बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' च्या अनुषंगाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यावर व त्यामध्ये व्यापक जनसहभाग घेण्यावर नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत भर दिला जात आहे. याच धर्तीवर 'स्वच्छता दिंडी' हा अभिनव उपक्रम विदयार्थी, शिक्षक व नागरिकांच्या एकत्रित सहभागातून राबविण्यात आला असून या उपक्रमाला मोठया प्रमाणावर मिळालेला उत्साही प्रतिसाद नवी मुंबईकर नागरिकांची स्वच्छतेविषयी असलेली जागरुकता सिध्द करणारा आहे. त्यामुळे सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी दररोज कचरा वर्गीकरण करुन, तो वेगवेगळा घंटागाडीत देऊन सहकार्य करावे तसेच विविध स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन ते यशस्वी करण्यासाठी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यात रासायनिक खतांचा पुरेसा पुरवठा

ठाणे : ठाणे जिल्ह्यात खरीप हंगामाखाली सर्व साधारण क्षेत्र ६०,००० हेक्टर एवढे आहे. त्यापैकी भात पिकाखालील क्षेत्र ५३, ९२३ एवढे आहे. त्याच प्रमाणे नाचणी पिकाखाली २४०६ हेक्टर, वरी पिकाखाली १००५ हेक्टर, कडधान्य पिकाखालील ९५५ हेक्टर, गळीत धान्य ४७२ हेक्टर आणि भाजीपाला पिकाखालील ७१५ हेक्टर आहे.
जिल्ह्यासाठी ११,११० मे. टन रासायनिक खतांची मागणी शासनाकडे करण्यात आली होती. शासनाकडून १०,००० मे.टन रासायनिक खतांचा साठा मंजूर करण्यात आले आहे. जिल्ह्यात खरीप हंगामाच्या सुरुवातीस १४५० मे.टन रासायनिक खतांचा साठा कृषि सेवा केंद्रांकडे उपलब्ध होता.
आज अखेर जिल्ह्यात ६४२८.२२ मे.टन रासायनिक खतांचा पुरवठा झालेला आहे. त्यापैकी युरीया- ५८९३.२२, DAP ५३, पोटॅश खते २४ मे. टन, सुफर फॉस्फेट १८ मे.टन व संयुक्त व मिश्र खते ४४० मे. टन असा पुरवठा आहे. ठाणे जिल्ह्यात खतांची कोणत्याही प्रकारची टंचाई नाही.
रासायनिक खतांची विक्री पॉस मशीनद्वारे करण्यात येत असून प्रत्यक्ष शेतकऱ्यांनाच खतांची विक्री करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे हंगामात खतांची टंचाई जाणवू नये यासाठी ९१० मे.टन युरीया व २० मे.टन DAP खतांचा संरक्षित साठा (Buffer Stock) करण्यात आला आहे. आतापर्यंत ५,५७३ हेक्टर क्षेत्रावर भात पिकाच्या रोपवाटिका तयार करण्यात आल्या आहेत अशी माहिती कृषि विभगाकडून देण्यात आली आहे.
जिल्ह्यात रासायनिक खत पुरवठा संबधातील नियोजन सुरळीत सुरू आहे. रासायनिक खतांच्या बाबतीत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास शेतकऱ्यांनी कृषि विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन कृषि विकास अधिकारी रामेश्वर पाचे यांनी केले आहे.

घरात घुसून अज्ञात चोरट्याने लांबविला मोबाईल

ठाणे : मोबाईल पहात असतानाच अचानक झोप लागल्याने अवघ्या १५ मिनटात अज्ञात चोरट्याने घरात घुसून १० हजाराचा मोबाईल घेऊन पळाला. चोरट्याला तक्रारदार छाया जैनवाल यांनी पहिले आणि आरडाओरड केली. मात्र सुसाट चोरट्याने पलायन केल्याची घटना रविवार(ता-३० जून) रोजी रात्री २-३० ते २-४५ दरम्यान घडली. याबाबत अज्ञात चोरट्याच्या विरोधात चितळसर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल केला. तक्रारदार छाया राजेश जैनवाल(४५) रा. एमएमआरडीए इमारत, बिल्डींग नं.१, रूम नं. ७०६, शुभारंभ गेट नं.२, भवानीनगर, मानपाडा, या उकाड्यामुळे दरवाजा उघड ठेवून तक्रारदार या मोबाईल बघत असताना त्यांना डूकला लागला. त्याच कालावधीत अज्ञात चोरट्याने संधी साधत घरात घुसून तक्रारदार यांचा विवो वय-१६ हा १० हजाराचा मोबाईल घेऊन पोबारा केला. चितळसर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म वाटप

कळवा : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्य शासनाची महत्त्वकांक्षी योजना असून या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी खारीगाव विभागामध्ये शिवसेना उपनेते दशरथ दादा पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये कळवा मुंब्रा विधानसभा महिला सह संघटक सौ रचना राकेश पाटील यांच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म वाटप करण्यात आले त्याप्रसंगी निर्मला सत्यवान पाटील भाविका भगत शितल जाधव पुनम बुबेरा संध्या केशव भगत उपस्थित होत्या त्याप्रसंगी रचना पाटील म्हणाल्या की मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही वंचित विधवा परित्यक्ता, आर्थिक दुर्बल महिलांसाठी महत्त्वाची योजना आहे महिलांना आर्थिक सहाय्य व्हावे कारण महिला कुटुंबातील एक महत्त्वाचा भाग त्यांच्याकडे काहीतरी उपलब्ध व्हावे व कुटुंबासाठी आर्थिक मदत मिळावी त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी जो निर्णय घेतला आहे त्याची आम्ही स्वागत करत आहोत.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१